-६।०।०८०२६

# रामाची करामत

लेखक :
कौंट लिओ टॉल्स्टॉय

★

IRBK-0108026

एकमेव विक्रेते
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

किंमत ३७ नये पैसे

सं. वाचनालय, ठाणें

श्रीमहालक्ष्मी प्रकाशन
बालविभाग

३७३ - २९५५३
८०२६

# रामाची करामत

★

लेखकः—

कौंट लिओ टॉल्स्टॉय

रूपांतरकार :—

बाळ आळतेकर

★

मे १९४८ )  ( किंमत ६ आणे

मेन एजंट:—

श्रीमहालक्ष्मी प्रकाशन संस्था,

महाद्वार रस्ता, कोल्हापूर.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. )

मुद्रक व प्रकाशक:—

अनंत गणेश जोशी,

दि स्टार प्रिंटिंग प्रेस,

कोल्हापूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

18 1 JAN

काय सांगताल तं करायला ?' रामानं उत्तर दिलं.

'किती राबताहात तुम्ही ? पण त्याची चीज करीत नाहीं तुमचा मालक' म्हणून ... नोकरी सोडून दिली तर नाही कां चालायचं ?

IRBK-0108026

IRBK-0108026

सोल एजंटः—

श्रीमहालक्ष्मी प्रकाशन संस्था,

कोल्हापूर.

वाचनालय ... १२ १९५४ ३-४-५७ वाचनालय

# रामाची करामत

‘ रामजी बुवा ! रामजी बुवा !’ कुणीं तरी मागून हाका मारीत होतं. रामा फारच घाईत होता त्याला पहिल्या दोन हांका ऐकूं आल्या नाहींत पण नंतर हांका जोरांतच येऊं लागल्या. रामा थांबला. कोण हांका मारीत असेल याची त्याला कल्पनाही नव्हती. त्यानं मागं वळून पाहिलं. ती एक मुलगीलीशी बाई होती. दिसायलाही फार सुंदर होती. तिला पाहिल्याबरोबरच रामाला ती फार आवडली.

‘ रामजीबुवा, इतक्या सकाळीं कुठं निघालात ?’ तिनं आपुलकीनं विचारलं.

‘ शेतांत निघालो आहे कामाला. आज कापणी सुरूं करायला सांगितलं आहे मालकांनीं. नोकरी आहे ही. मग नको का काय सांगतील ते करायला ? ’ रामानं उत्तर दिलं.

‘ किती राबताहात तुम्ही ? पण त्याची चीज करीत नाहीं तुमचा मालक म्हणून [illegible] मला नोकरी सोडून दिली तर नाही कां चालायचं ?

IRBK-0108026

'वा ग वा, नोकरी सोडून काय करूं मी ?'

'असं घाबरता का ? नोकरी म्हणजे दुसऱ्याची ताबेदारी कितीही काम केलं. कितीही कष्ट केले तरी तुम्हाला त्याचा काय फायदा, जे काय मालक खायला देईल, ते खायचं. जे काय कापड देईल तेच घालायच. अन् त्याशिवाय त्याची बोलणी खायची. कुणी सांगितलाय एवढा खटाटोप. तुमचे हात चांगले आहेत. तुमच्या अंगांत ताकद आहे. तुमचं मन मोठं आहे. इथच राहून काय करायचं ! चला आपण शहरांत जाऊं या.'

'मला देखील वाटतं कधीकधी येथून जाव असं पण जाणार तरी कुठं ? कोण आहें आपलं ! अन् शहरांत तरी जागा कोण देणार ! जेवायला कोण वाढणार ! म्हणूनच जाऊं नये वाटतं मला.'

'एवढीच ना तुमची काळजी ? मी करते सगळी व्यवस्था. माझी मावशी आहे शहरांत. ती देईल जागा बघून. आपण घर करूं तुम्ही काम करा. घरी सगळ सामान आणून द्या. मी घालीन तुम्हाला जेवायला करून.'

'म्हणजे तूंही माझ्याजवळ राहणार ?'

'हो, तुमच्याजवळ राहीन. तुमच्याशीं लग्न करीन. दोघ मिळून राहूं आनंदानं.'

'खरंच ! पण माझ्याजवळ पैसा नाहीं. माझं असं कांहींच नाहीं. तुला काय सुख मिळणार माझ्याकडून?'

'सुख कांहीं पैशातच असत नाही. कपडे वापरून खरं सुख नाहीं मिळत. खरं सुख आपल्या मनांत असतं ज्यांचं मन चांगलं असतं त्याला सुखाची कमतरता नसते. तुमचं मन चांगलं आहे. तुम्ही सुखी होणारच. तुमचं सुख तेंच माझं सुख. माझ्या सुखाची तुम्ही नका काळजी करूं. तुम्ही तयार व्हा म्हणजे झालं. इच्छा चांगली असली म्हणजे परमेश्वर नाही कधी करीत कुणाला.'

'बरं तर, तुझी इच्छा आहे. मला ही शहरांत जाणं आवडतं. जाऊं या आपण. पण सगळं तूं केलं पाहिजेस प्रथम. मग मी काम करीन तुला धान्य आणून देईन कपडे आणून देईन, सगळं सगळं आणीन'

'आता नको शेताकडं जायला. आपण असंच जाऊं शहराकडं.'

त्यांचा विचार ठरला. तीं दोघेही आनंदांत शहराकडे निघाली.

* * *

रामा गडी होता. कुणालाही विचारा रामा ज्याला ठाऊक नाहीं असा त्या गांवांत कुणीही नव्हता. लहान मुलं, मोठीं माणसं, म्हातारी कोतारी सगळी सगळी ओळखत होती त्याला. अन् कां कोण ओळखणार नाहीं ? कोणत्याही वेळेला जा. कांहींही काम सांगा. रामा कधी कुणाला नाहीं म्हणायचा नाहीं. त्याला आळस असा ठाऊक नव्हता. आयतं खाणं, फुकटचं खाणं त्याला आवडत नव्हतं. स्वतः राबून जें जें काय मिळेल तें खाऊन सुखी होता तो. पैशाची हांव नव्हती त्याला. हांव असते कशासाठीं ? कांहींतरी चैन

करण्यासाठींच ना ? पण चैन करायची केव्हां बिचाऱ्यानं ? सदा सर्वकाळ कामांत. आपले कपडे चांगले असावेत हेंही त्याला आवडत नव्हतं. चांगले कपडे घातले तर चालेल कसं आपल्याला ! आपण पडलो गडी, चिखलात काम करावं लागतं डोक्यावरनं ओझीं वहावी लागतात, शेतांत कामं करावीं लागतात तिथं चांगल्या कपड्यांचा काय उपयोग ? रहायला आरामशीर जागा असावी असंही वाटत नव्हतं त्याला. दिवसभर राबायचं, दमून जाई जीव ! जमिनीला पाठ लागली रे लागली कीं गाढ झोंप यायची त्याला. त्याला कशाचीच हांव नव्हती. आहे त्यांत सुख मानून घेत होता तो. कुणाचा हेवा नाहीं कुणाचा द्वेष नाही. 'आपला हात जगन्नाथ' अशा वृत्तीचा माणूस होता तो. मग तुम्हीच सांगा त्याला कोण वाईट म्हणेल ? कोण त्याला नांव ठेवील ? सगळी सगळी त्याला चांगलाच म्हणत.

तो एका जमीनदाराकडे नोकर होता. जमीनदार कांहीं चांगलें वागवत नसे. खूप खूप राबवून घेई त्याला. कपडेही फाटके तुटकेच देई. खायलाही शिळपाकंच घाली. पण रामानं कधीं तक्रार केली नाहीं. आपल्या मालकाच्या कामांत कधी कसूरही केली नाहीं.

रामा तरुण होता. दिसायलाही सुंदर होता. आपले आईबाप आहेत कीं नाहीं हे त्यालाही ठाऊक नव्हतं. पण एक आत्या होती. तिनच त्याला वाढविलं होतं. तिलाही मुलंबाळं होतीच. दुसऱ्याच्या घरी किती दिवस राहायचं. स्वतः मिळवून खाण्यासाठीं रामा या गावांत राहायला आला होता.

दररोजप्रमाणे आजही तो कामावर लौकर निघाला. नुकतीच पहांट होत होती. अजून दिवस उजाडायला बराच अवकाश होता. पण रामाच्या सरावाची वाट होती. तो भरभर चालत होता. वाटेंतच त्याला एक ओढा लागला. त्या स्वच्छ पाण्यांत त्यानं आपलं तोंड धुतलं. तो पुढं निघाला. याचवेळीं त्याला हांका ऐकू आल्या. अन त्या दोघांचा शहराकडे जाण्याचा बेत ठरला.

*　　　　*　　　　*

तेथून कांहीं फार लांब नव्हतं शहर. दोनप्रहरच्या आंतच ती शहरांत आली. तिच्या मावशीचं घर एका बाजूला होतं मावशीला आनंद झाला. तिनं रामाची ओळख करून घेतली. रामा तिलाही आवडला. भाचीची निवड तिला पसंत पडली. दोघांच लग्न झालं. शेजारीच एक झोपडी रिकामी होती. ती दुरुस्त केली. चांगली सारवून घेऊन रामा अन् रामाची बायको सुखानं राहूं लागली.

त्यांचे दिवस आनंदांत जाऊ लागले. कशाची कमतरता नव्हती. अगदीं कशाचीच काळजी नव्हती त्यांना पण—

त्या शहराचा राजा फार वाईट होता. आपणाला सगळ्यांनीं देवाप्रमाणं मानलं पाहिजे, आपल्या शब्दाला प्रत्येकानं मान वाकविली पाहिजे असा त्याचा आग्रह होता; आणि जो कोणी त्याच्या मनाविरुद्ध वागे, त्याला नावे ठेवी त्याला तो कैदेंत टाकी. त्याचा छळ करी. सगळे लोक त्याला भिऊन थरथरा कांपत. त्याच्याबद्दल कुणाला आदर वाटत नसे पण तस बोलून दाखविण्याची कुणाची छाती नव्हती.

आज त्याचा वाढदिवस होता. मोठी मिरवणूक निघाली होती. त्यांत हत्ती होते, घोडे होते, राजाचे शिपाई होते. मोठा मोठाच थाट होता' ती मिरवणूक पाहायला रामाची बायको जाणार नव्हती पण शेजारच्या बायकांनीं आग्रह केला तीही मिरवणूक पाहायला निघाली.

एका हत्तीच्या अंबारीत राजा एका लोडाला टेकून पडला होता, अजगरासारखा सुस्त दिसत होता तो, त्याच्या अंगावरची माशी देखील उठवायला त्याच्या नोकरानां लागत होत लोकांनीं नमस्कार केला तर त्यांना परत नमस्कार करायला देखील त्याला धड यत नव्हतं. इतका तो सुस्त झाला होता, रामाच्या बायकोला हसूं आल. तिला राजाबद्दल लोकानीं काय काय सांगितल होत याचा विसर पडला. ती मोठमोठ्यान हसूं लागली.

एवढ्या मोठ्या मिरवणुकीत एक बाई हसते आहे हे पाहून राजाच तिच्याकड लक्ष गेल, त्याला राग आला, आपल्या शिपायाना पाठवून त्यान तिला बोलावून घेतल,

' कोण आहेस ग तू ? अन् तोंड वेंगाडून हसत होतीस कुणाला ?' राजान दरडावून विचारले,

'आहे अशीच एका कामकऱ्याची बायको अन् दुसऱ्या कुणाला हंसणार ? तुम्हालाच कीं, देवान चांगले हात पाय दिले आहेत त्यांचा उपयोगसुध्दा नाहीं करायंला येत तुम्हाला, राजा म्हणे ! ऐदी बरा आजगर देखील चांगला असतो तुमच्यापेक्षा,' तिन न भीता राजाला उत्तर दिल, आतां राजा तिला मारणार अशीच सर्वांना भीति पडली,

सगळ्यांचा थरकाप उडाला. पण कांहींच झाल नाही निमूटपणे मिरवणूक निघून गेली. आपल्याला भर मिरवणुकीत बोलणारी बाई आजच त्याला भेटली होती. त्याला राग आला होता. त्याचा संताप उडाला होता. पण काय करणार तिच्या डोळ्याला डोळा भिडवायची देखील त्याच्या आंगी धमक नव्हती. दोषी माणसं भित्रीच असतात. अन् खोट अस ती काय बोलली होती. पण कांहींही झाल तरी तो राजा होता. राजाचा अपमान झाला होता. त्याला राग येणारच. पण मनांत ठेवूनच त्यान आपली मिरवणूक पुढे न्यायला सांगितली. जस कांहींच घडल नाही अशा निर्विकार मनान रामाची बायको घराकडे परतली.

मिरवणूक सम्पली. राजा राजवाड्यांत आला. त्याला आपल्या अपमानाचा बदला घ्यायचा होता. ती बाई होती तिला उघड शिक्षा करण त्याला शक्य नव्हत. सगळी प्रजा उलटली असती त्याच्यावर.

त्यानं आपल्या सल्लागारांनां बोलावल त्यांना प्रश्न केला माझा अपमान एका स्त्रीन केला आहे त्याचा बदला घ्यायचा आहे मला. तो कसा घ्यायचा हाच विचार घ्यायला तुम्हाला बोलावल आहे मी. राजान त्याना झालेली सगळी हकीकत सांगितली. सल्लागारांना देखील कोडच पडल. ती एकटीच बाई नव्हती. तिचा नवरा होता. नाहींतर तिला राजवाड्यांत कामाला बोलावली असती. भरपूर काम देऊन चांगली खोड मोडली असती तिची. खूप विचार केला, अखेरीस त्यानी ठरविल त्या नवरा बायकोना दोघांनाही राजवाड्यांत कामाला बोलावून घ्यायचं. राजाचा हुकूम म्हणजे येणार नाहीत अस व्हायच नाही. अन् एकदा कामाला आली म्हणजे त्याना कामच काम

देऊन त्यांची खोड मोडायची. राजालाही त्यांचा बेत पसंत पडला. दुसऱ्या दिवशीच त्यांना बोलवायचा हुकूम सुटला.

रामा सन्ध्याकाळी घरी आला. त्याला सगळा प्रकार समजलाच होता. त्याला काळजी वाटू लागली. त्यान बायकोला विचारलही. पण ती बिलकुल घाबरली नव्हती. उलट तिनच रामाला धीर दिला, ' अस घाबरता कां ? आपण कांहीं वाईट तर केल नाहीं ना ? वाईट कांहीं केल नाहीं मी. खोट कांहीं बोलले नाहीं मी खऱ्याची चाड परमेश्वराला असतेच. तो तारील आपल्याला कोणत्याही सन्कटातून. तुम्ही अगदीं कांहीं काळजी करू नका माझी मी पाहून घेते सगळें '

रामाच समाधान झाल तो निष्काळजी झाला. सकाळ झाली रामा कामाला जाण्यासाठी निघणार तोंच राजवाड्यांतले शिपाई आले.

' तुम्ही दोघांनींही राजवाड्यांत कामाला आल पाहिजे आतांच्या आतां ' त्यानीं दरडावणीच्या स्वरांत त्या नवरा बायकोना बजावल.

' एवढच ना? आम्हाला काय कुठही काम करायचच. राजवाडा काय, शेत काय दोन्हीही सारखींच. चला तुम्ही पुढं. माझी न्याहरी बांधून घेतो आणि आतांच येतो. ' रामानं शांतपणे उत्तर दिलं.

शिपाई गेले. रामा आंत आला. बायकोचा त्यान विचार घेतला. ' तुम्ही जा राजवाड्यांत माझ्याबद्दल विचारलच तर सांगा तिनही येऊन इथ कामच करायच ना ? मी करतो तिच्या वाटणीच काम. मग नाहीं त्यांना कांहीं बोलता यायच अन् त्यानीं काम

दिल तर तें किती आहे. कस होणार याचा विचारही मनांत आणू नका. सरळ कामाला सुरवात करा म्हणजे ते सगळं संपवाल तुम्ही. दिवस मावळावयाच्या आंत परत या म्हणजे झालं. ' रामाच्या बायकोनं त्याला धीर दिला. न्याहरी बांधून घेऊन तो राजवाड्यांत आला

देवडीवर आल्यावर शिपायान त्याला अडविल. ' काय रे, तू एकटाच आलास ? तुझी बायको नाही आली ती ? ' ' ती येऊन आणि काय करणार ? मी करतो ना तिचही काम ' रामान उत्तर दिल.

त्याच्या उत्तरान शिपायाना हंसू आल. त्याना ठाऊक होत कीं त्यालाच म्हणून दिलेल काम फार जास्त होत. त्यांत हा आपल्या बायकोचही करणार म्हणे ! मूर्ख आहे झाल. चांगली खोड मोडेल मस्तवालाची. ते आपापसांत कुजबुजत होते.

रामा कोठींत गेला.त्याला धान्य निवडायला दिलं. एका माणसाच्या हातून झालं असतं त्याच्या तिप्पट काम दिलं होत त्याला. त्याच्या शिवाय त्याच्या बायकोचंही होतं. संध्याकाळीं त्याला ते संपविणं भाग होतं. रामानं देवाच नांव घेतलं. इकडं तिकड न पाहता, कस झेपेल याचा विचारही मनांत न आणता त्यानं सुरवात केली. अन् काय आश्चर्य ! सांगितलेल्या वेळेच्या आंतच त्यानं तें सगळं काम पुरं केलं. रामा काम आटोपून घराकडे परतला. राजवाड्यातल्या शिपायाना आश्चर्य वाटलं. राजाला देखील आश्चर्य वाटलं. पण त्याच्या विरुध्द बोलायची ताकद नव्हती कुणाला. सांगितल होतं तें काम

त्यानं पुरं केलं होत. एवढयानं काय झालं!' उद्या आणखी काम देऊया. मग तरी रग जिरेल त्याची. राजानं समाधान मानून घेतलं.

रामा घरी आला त्याची बायको वाट पहातच उभी होती. तिनं त्याला आल्याबरोबर गरम पाणी पाय धुवायला दिलं. ऊन ऊन भाकरी खायला घातली. त्याचं अंग रगडलं. रामानं राजवाडयातली सगळी हकीगत सांगितली. अन् उद्याही बोलाविलं आहे म्हणून सांगितलं.

" बोलावूं देत ते. कांहीं काळजी करूं नका तुम्ही. जेवढं सांगितलं तेवढं काम करा म्हणजे झालं "

रामा दमून आला होता त्याला झोंप आली तीं दोघे गाढ झोंपी गेली.

पहांटेलाच रामाला त्याच्या बायकोन उठविलं. त्याला न्याहरी बांधून दिली. रामा राजवाडयांत निघाला आज त्याला कुणी दरडावलं नाहीं, कुणी कांहीं विचारलं नाहीं. तो सरळ कामाकडे निघाला आज कालच्या दुप्पट काम दिलं होतं त्याला. आपल्या बायकोनं कांहीं विचार मनांत आणायचाच नाही म्हणून सांगितलेलं त्याला आठवलं. तो सरळ कामाला लागला. आजही त्याने ते सगळं काम पुरं केलं.

राजाचे नोकर विचारच करीत राहिले. आतां पहिले दोन चार दिवस करील हा काम. पण पुढं काय टिकाव लागणार याचा. दररोज दुप्पट काम दिलं म्हणजे ! त्यानी समाधान मानून घेतलं.

रामा घरीं आला कालच्या प्रमाणंच त्याची बायकोने सेवा

२५७७३
भा. वा
१९५४

केली, रामा शांत मनानें झोंपी गेला. आठ दिवस झाले रामाचं काम दररोज दुप्पट दुप्पट वाढत होतं, पण तें अगदीं सराईताप्रमाण पुरं होत होत, तो दररोज ठरल्या वेळीं घरीं जात होता.

राजाला आश्चर्य वाटलं, त्याला अपमानाचा बदला अजूनही घेता आला नव्हता, त्यानं धीर मात्र आजून सोडला नव्हता. आपण त्याला धान्य निवडायचं काम दिलं उद्यां दुसरं कांहींतरी किच-कट काम देऊं, तेंही त्यान केलं तर आणखीन् किचकट काम देऊं, दहा माणसांचं काम देऊं, दहा हत्तींचीं काम देऊं. पण त्याची रग जिरवू. त्याच्या बायकोला माझा राजवाडा झाडायला ठेवीन तरच माझ्या अपमानाचा बदला घेतला जाईल. राजा आपल्या मनाच समाधान करून घेत होता.

किती ही काम असल तरी तें यंत्रासारखं रामाच्या हातून होत होतं, तो संध्याकाळी आनंदानं परत जात होता अन् समजा कांहीं कष्ट झालेच तर त्याची बायको होतीच सेवा करायला. घरीं आल्यावर तिच्या प्रेमळ बोलण्यानं तिच्या हातच्या गोड स्वयंपाकानं त्याचे श्रम कुठल्या कुठं निघून जात, त्याला गाढ झोपं येई तो पहिल्या पेक्षाही ताजातवाना होऊन कामाला जाई.

* * *

दहा—नाही पंधरा—दिवस गेले, राजानं आपल्या कल्पने प्रमाण मनुष्याला अशक्य अशी कष्टाची काम देऊन पाहिली पण रामानं ती चुटकीसरशी उडवून दाखविली. प्रत्येक वेळेला त्यान राजाची जिरविली, राजाचा संताप आता जास्तच झाला होता, त्याला आपल्या

अपमानाचा सूड अजूनही घेता आला नव्हता. त्यानं आपल्या सल्लागारांना परत बोलावून आणलें.

" हें पहा तुमचा सल्ला माझ्या किती उपयोगी पडला तें दिसतच आहे. आज तो आपल्या कामांत कसूर करील, आज त्याला आपलं काम ठराविक वेळेंत करता येणार नाहीं. अशी मी दररोज वाट पहात आहे. त्याच्याकडून थोडीशीहि कसूर झालीं असती त्याला थोडासाही जास्त वेळ लागला असतां तर मी त्याला कैदेतं टाकलं असत. त्याच्या बायकोला माझा राजवाडा लोटायला लावलं असतं. माझ्या अपमानाचा सूड घेतला गेला असता. पण इथं काय ! दररोज तो आपलं काम व्यवस्थित करतो आहे. माझ्या नाकावर टिच्चून राजवाडयांतून जातो आहे. तुमची युक्ति तर निरुपयोगी ठरली आहे आता दुसरी कांहीं युक्ती काढा. नाही तर तुमची धडगत मी ठेवणार नाही हें मात्र लक्षात ठेवा.' राजान त्याना बजाविल.

' महाराज, क्षमा करा.' त्याचे सल्लागार नम्रपणे बोलू लागले. " आमची युक्ति निरुपयोगी ठरली याची आम्हाला लाज वाटते. पण आम्हाला शंका येऊ लागली आहे. त्याला कसलही काम दिल कितीही कष्टाच दिल तरी तो पुर करतो. साध्या माणसाच्या हातून कांहीं शक्य नाहीं होणार हे. कांहीं तरी चेटूक असल पाहिजे त्याच्या जवळ. नाही तर त्याची बायको जादुगारीण असली पाहिजे. आतां खरीच त्याच्याजवळ जादू आहे का याची परीक्षा घेऊ या आपण त्याला उद्यां एका दिवसांत देऊळ बाधायला सांगू.' राजाला त्यांनीं सल्ला दिला. राजालाही तो पसंत पडला. तावडतोब राजान रामाला बोलावून घेतल.

'रामा, तू आतापर्यंत आम्ही सांगितलेलीं सगळीं काम केली आहेस पण उद्यां एका दिवसांत तू एक देऊळ बांधून दाखविल पाहिजेस. देऊळ छान झाल पाहिजे हं. अन् नाही झाल तर तुझी गय बिलकूल करणार नाही मी. तुझ डोक उडवायलाही कमी करणार नाही मी.' राजान त्याला धमकी दिली.

धांवत धांवतच रामा घरीं आला. बायकोन दिलेल्या पाण्यानी कसेतरी हात पाय धुतले. जेवणाची त्याला इच्छा नव्हती. तो घाबरुन गेला होता.

"अग ए चल आतां आपण येथून जाऊया निघून. उद्यां नाही माझी धडगत लागणार. उद्यां एका दिवसांत देऊळ बांधायला सांगितलय अन् नाहीं झाल तर मला फांशी देणार आहे राजा" रामान धडधडत्या छातीन सगळी हकीकत सांगितली.

"इतक सांगितल तरी तुम्ही घाबरताच अजून. अन् आपण पळून जायच म्हणता पण जाणार जाणार ते कुठ जाणार. राजाचे शिपाई आहेत ते घोडयावरून येऊन आमचा पाठलाग कर· तील. आम्ही कुठही गेलो तरी आम्हाला पकडून आणल्याशिवाय राहणार नाहीत ते. म्हणजे मग राजाची शिक्षा जास्तच बोकांडी बसणार. तुम्ही कांहीं शंका मनांत आणू नका. परमेश्वर नाहीं छळ होऊन देणार आम्हा गरिबांचा. आम्ही कुणाचा कांहीं अपराध केला नाहीं. कुणाच कांहीं वाईट झाल नाहीं आमच्या हातून. परमेश्वराला दिसत आहे सगळ. तो नाही उघड्या डोळयान अन्याय सहन करणार. उद्याच उद्या! आज का त्याची काळजी? अन् माझ्यामुळच हा

त्रास होतो आहे हें मी नाहीं विसरले. पाहून घेते माझं मी सगळ ! बसा आता तुम्ही जेवायला. पोटभर जेवा दमून आलात, मी चेपते तुमचे पाय. निश्चित मनान झोपी जा. रामाला एवढा धीर मिळाल्यावर त्याची भीति कुठल्या कुठ पळून गेली. तो पोटभर जेवला. शांतपणे झोपी गेला.

*　　　*　　　*

पहांटेलाच त्याच्या बायकोनं त्याला उठविलं. त्याला न्याहरी बांधून दिली. एक हातोडी थोडे खिळे आणि रंधा दिला.

'हें पाहा, परमेश्वराच्या कृपेनं तुमच्या राजाला पाहिजे त्याच्यापेक्षां चांगलं देऊळ तयार झालं आहे. आतां तुम्ही जा तिथं. देवळाच्या छताचं थोडं काम राहिलं आहे. हें सामान घेऊन तें पुरं करा म्हणजे झालं.' त्याच्या बायकोनं त्याला निरोप देत सूचना दिल्या.

रामा लगबगीन राजवाड्याकडे निघाला. चौकांतच एक भव्य मंदीर बांधलेल दिसल. अजून दिवस उजाडायचा होता. रामानं कामाला सुरवात केली.

दिवस उजाडू लागला. लोक आश्चर्य करू लागले. इतक सुंदर मंदीर त्यानी अजूनपर्यंत कधी पाहिल नव्हत. जो तो त्या मंदीराची स्तुति करीत होता. रामाचं लोकांकडं लक्ष नव्हतं. तो आपल्या कामातंच मग्न होता. राजाही सकाळीं उठला. त्यान खिडकींतून बाहेर पाहिलं. त्या मंदीराचं शिखर सूर्य प्रकाशांत झळकत होतं. सगळे

लोक मंदीर पहाण्यासाठीं जात होते. बघून येत असलेले त्या मंदीराची स्तुति करीत होते. राजाची चांगलीच जिरली होती पण त्या बरोबर तो घाबरलाही होता. त्याला रामाची भीति वाटू लागली. एका दिवसांत हा देऊळ बांधू शकतो त्याच्याजवळ प्रचंड शक्ती असली पाहिजे. त्याला जादू येत असली पाहिजे. माझ्यावर देखील प्रयोग करणार नाही कशावरुन तो? त्याला शंका येऊं लागली. चोराच्या मनात चांदण. त्याला नाही नाही त्या शंका येऊं लागल्या. पण अजूनही अपमानाच्या सूडाचा विचार तो घालवू शकला नाहीं. आपली भीति त्यान दडपून टाकली. शंका कुशंका जाळून टाकल्या. आज त्यान एका दिवसांत देऊळ बांधलं आहे, उद्या आपण त्याला एका रात्रींत राजवाड्यांभोंवती तलाव बांधायला सांगू. त्याला सगळीकडे घाट असला पाहिजे. ठिकठिकाणीं बागा असल्या पाहिजेत तलावांत मोठमोठ्या नावा हिंडल्या पाहिजेत आणि हे सगळं नाहीं झाल तर त्याच डोक उडवायच. राजान आपल्या मनाशीं विचार केला. राजाचाच विचार तो त्यान तांबडतोब रामाला बोलावून घेतल. त्याला तलावाची गोष्ट सांगितली. रामान सगळ निमूटपणान ऐकून घेतल.

कालच्या पेक्षा आज तो जास्त घाबरून घरीं आला. पण बायकोन त्याची पुनः समजूत घातली. तो निश्चित मनान झोपीं गेला.

भल्या पहांटे त्याच्या बायकोन त्याला उठविल.

" हें पहा, सगळा तयार झाला आहे तलाव. तुमचा राजा म्हणत होता त्याही पेक्षा सुंदर झाला आहे तो. सभोवती संगमरवरी दगडाचा घाट आहे. छान छान फुलांच्या बागा आहेत. नावाही पण

तळावांत फिरत आहेत. राजहंस आहेत. सगळ सगळ कांही आहे. आतां त्या राजवाडयाच्या बाजूला थोडी रेती राहिली आहे ती हें फावड घेऊन सारखी करा, म्हणजे सकाळच्या आंत सगळ काम पुर होईल. बायकोन रामाला समजावून दिलं.'

हातांत फावड घेऊन रामा ती रेती सारखी करण्यासाठीं गेला. किती छान झाला होता तळाव !

राजा देखील सकाळी लवकर उठला. रामान आपल्या म्हणण्याप्रमाण तळाव केला नाहीं. त्याला मी फांशीं दिलं. त्याच्या बायकोला राजवाडा झाडतांना मी पाहिलं. तिच्या उर्मट पणाचा मी पाणउतारा केला. कशी छान जिरविली तिची. माझा अपमान करते नाहीं—राजाल रात्रभर स्वप्नें पडत होतीं.

पण समोर पतो तों काय ! किती सुंदर तळाव दिसत होता. किती छान छान नाव। दिसत होत्या त्यांत ! राजाची आता चांगली-च जिरली. आता मात्र त्याची धारण धाब्यावर बसली. रामाच्या शक्तीची त्याला पुरी कल्पना आली. आपण सूडाच्या नादीं लागलो याचा त्याला पश्चात्ताप होऊ लागला. आपल राजेपण टिकेल की नाहीं याची त्याला शंका वाटू लागली. कर्दन काळाप्रमाण रामा त्याला दिसूं लागला. तावडतोब राजान आपल्या सल्लागारांना बोलावल. रामाला त्याला नेस्तनाबूद करायच होत. कांहींही कारण काढून रामाला त्याला नाहीस करण भाग होत. त्याला आपल्या सल्लागारांचा-ही पण राग आला होता. कां येणार नाहीं ? त्यांचा सल्ला अगदी वाऱ्यावर गेला होता. रामाला शिक्षा तर राहोच पण उलट राजालाच

चांगली दहशत बसली गेली. राजा रागानं जळफळूं लागला. त्यानं सल्लागारांना नाही नाही तें बोलून घेतलं. एवढंच नव्हे तर रामाला घालविण्याची, त्याला दूर करण्याची ते जर युक्ती शोधून काढूं शकले नाहींत तर रामाअगोदर त्यांचीच डोकीं उडविली जातील म्हणून त्यानं सल्लागाराना निक्षून बजावलं. राजाचा रुद्रावतार पाहून त्याच्या सल्लागारांचं धाबं दणाणून गेलं. हुकूमशहापुढं त्यांचा शहाणपणा निरुपयोगी ठरणार होता: पण जिवाची काळजी प्रत्येकाला असतेच. राजाची विनवणी करून, त्याच्या पाया पडून त्यांनीं थोडी मुदत मागून घेतली. नाखुषीनं कां होईना राजानं संमती दिली पण युक्ती सफल झाली पाहिजे नाहीतर मरणाला तयार झालं पाहिजे. अशी पुन: ताकीद द्यायला तो विसरला नाहीं.

सल्लागार जमले. त्यांचीं डोकीं एकमेकांना घासूं लागली. एक म्हणाला त्याला सातासमुद्रांतून रत्न शोधून आणायला सांगू. दुसरा म्हणाला पाताळांत जाऊन नागराजाची राजधानी इथं आणायला सांगू. नाही नाही त्या युक्त्या त्यांच्या टाळक्यांतून निघूं लागल्या. पण त्यांना त्या युक्त्या सफल होतील कीं नाहीं याची शंका येत होती. एका दिवसांत देऊळ बांधणारा, एका रात्रींत तलाव बांधणारा माणूस काय वाटेल तें करूं शकेल, अशी त्यांना भीति वाटूं लागली. त्यांचीं युक्ती सफल झाली नाहीं तर त्यांच्या प्राणावर प्रसंग येऊन ठेपणार होता.

सारखा विचार करीत होते ते. जेवणखाण देखील त्यांना सुचत नव्हतं. अखेरीस त्यांनीं एक युक्ती शोधून काढली. रामाला अमक्या ठिकाणीं जा असं मोघमच सांगायचं, अन् अमकी वस्तू घेऊन ये.

वस्तूचं नांव नाहीं सांगायचं, दिशेचं, गांवाचं ठिकाणाचंहि नांव सांगायचं नाहीं अन् तो परत आला तर त्याला सांगायचं चुकलास तूं. आम्ही तुला तिकडं कुठं जायला सांगितलं होतं. आणि वस्तूही पण घेऊन आला तर ही कुठं वस्तू आणायला सांगितली होती? असं म्हणायचं. आयताच तो पकडीत सांपडतो. राजाची आज्ञा आयतीच मोडली जाते, मग राजानं त्याला फांशी द्यावं. असा पेंच पडल्यावर तो मरायला परत येईल तरी कशाला ? सर्वांच्या मतें ही युक्ती अगदी नामी ठरली. त्याना समाधानही वाटलं. धांवत धांवत जाऊन त्यांनीं राजाला ही आपली युक्ती सांगितली. राजाला तर सोळा आणे पसंत पडली तो खूष झाला. त्यानं सल्लागारानां त्यांच्या युक्तीबद्दल नामी बक्षीसही पण दिलं. त्यानं तावडतोब रामाला बोलावून आणून आज्ञा सुनावली.

आतां मात्र रामा खरोखरींच भ्याला. त्यानं कांहींही केलं असतं तरी तो कचाट्यांत सांपडणार होता. राजवाड्यांतून कसातरी जीव धरून तो घरीं आला. त्यानं बायकोला सगळी हकीकत सांगितली.

‘ आतां मात्र राजानं चांगलं डोकं लढविलं आहे, पण माझ्याशीं गाठ आहे म्हणावं ’ ती आपल्या मनाशीं म्हणाली.

‘ अशीं युक्ती काढली आहे का राजानं ? ’ ती रामाशीं बोलूं लागली, ‘ पण घाबरण्यासारखं कांहीं नाहीं. तुम्ही कांहीं काळजी करूं नका. आतापर्यंत जसा परमेश्वर तारत आला तसाच याही संकटांतून तो तारील आपणाला. ’ तिनं रामाची समजूत घातली.

रामाचा तिच्यावर विश्वास होता. आपली बायको म्हणते तसं खात्रीनं होत आहे याचा अनुभव आला होता त्याला. त्यानं कसली-ही शंका मनात आणली नाहीं. जेवून खाऊन तो गाढ झोपी गेला.

* * *

आजही लौकरच रामाला त्याच्या बायकोनं उठविलं. त्याला आंघोळ घातली. त्याला जेवायलाही लवकर वाढलं आणि त्याच्या जवळ पांच सहा दिवस प्रवासांत पुरतील इतक्या भाकरी बांधून दिल्या.

' हें पहा आतां आपण देखील जरा विचारानं वागलं पाहिजे. माझी बुध्दी इतके दिवस चालली, पण आज नाहीं चालत. जशास तसंच वागलं पाहिजे. हार नाही जायचं राजाला. मला सोडून रहावं लागणार आहे तुम्हाला थोडया दिवसाकरतां. पण मला खात्री आहे. परमेश्वरावर माझा विश्वास आहे. आपणाला कांहीं त्रास करूं देणार नाही तो राजाला. ही रहाटाची चात घ्या अन् सरळ पूर्वेकडचा रस्ता चालू लागा. भर भर जा म्हणजे आजपासून सहाव्या दिवशीं तुम्ही एका गावीं पोहोचाल, त्या गांवापासून थोडयाच अंतरावर तुम्हाला एक अंबराई लागेल. तिथं सैन्याचा तळही दिसेल. तीच खूण समजा. त्या सैन्यातल्या कुणाही शिपाया-ला विचारा इथं आजी कुठं राहतात म्हणून ? तो दाखवील तुम्हाला घर. त्या घरांत समोरच सूत काढायचा रहाट दिसेल. तेंच आपल्या आजीचं घर. तिला ही चाती दाखवा मी खुशाल आहे म्हणून सांगा. म्हणजे ओळख पटेल माझी तिला. ती काढेल युक्ती शोधून. सरळ

मी सांगितलेली खूण लक्षांत ठेवून जा. लोक काय म्हणतात इकडं लक्ष देऊं नका. तुम्हांला कांहीं त्रास होणार नाहीं. माझी कांहीं काळजी करूं नका मला कांहीं करता येणार नाहीं त्या अजगराला मी अगदीं सुखरूप राहीन तुम्ही परत येईपर्यंत. सगळ राहील ना लक्षांत. जा आता तुम्ही ' रामाच्या बायकोनं त्याला धीर दिला. सगळं समजावून दिलं. रामानंही पण तें सगळं लक्षांत धरलं. तो निघाला.

झपझप पावलें टाकीत तो जात होता. रस्त्यानं त्याला किती तरी लोक भेटत होते. त्याची विचारपूस करीत होते. पण हा आपला जेवढ्यास तेवढीं उत्तरें देऊन प्रसंग टाळून नेत होता.

सहाव्या दिवशीं तो आंबराईजवळ आला. शेजारी शिपायांचा तळ होतांच. त्यानं एकाला आजीच्या घराचा पत्ता विचारला.

' अरे बाबा, त्या चेटकीणीकडं कशाला मरायला जातोस ! त्या शिपायानं रामाला भीति घातली.

' नाहीं आपलं सहज भेटायचं आहे तिला '

' नको रे बाबा ! शहाणा असशील तर परत जा. अरे, ती फार भयंकर बाई आहे, जादुगारीण आहे, तुला कुत्रं मांजर बनवून टाकील चटदिशी. तिच्या वाऱ्याला देखील उभा राहूं नकोस ' त्या शिपायानं त्याची पुन्हा समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

' अरे बाबा, ती काय करतेय् मला ? माझ्या नशिबांत कुत्रं मांजरच व्हायचं असेल तर तसं मला होणं भाग आहे. सांगा ना कुठंशी आहे तिची झोपडी ? ' रामानं त्याला विनवून विचारले.

'जा बाबा जाणार असशील तर, येथून हा सातवा आंबा दिसतो आहे ना त्याच्यासमोरून एक रस्ता गेला आहे. त्या रस्त्याच्या कडेला तिची झोंपडी आहे.'

रामाला तेवढंच पाहिजे होतं. त्या शिपायाला नमस्कार करून तो पुढं निघाला. त्याला झोंपडी सांपडली. म्हातारी सूत कांतीत पाठमोरी बसली होती. रामा न भीता तिच्यासमोर गेला. त्यानं तिला साष्टांग नमस्कार घातला.

'कायरे, कोण तूं आगांतुक ? कांहीं नाहीं मिळायचं इथं हो चालता येथून' ती म्हातारी त्याच्या अंगावर खेंकसली. त्याला हुसकून लावण्याठी आपली हात टेकायची काठीही पण तिनं उगारली.

'आपला नातजांवई आहे मी' रामानं नम्रपणान उत्तर दिलं.

'कुठली नात माझी ! चोर आहेस तूं ! माझी नात मोकळं नाहीं पाठवायची कुणाला' पुनः म्हातारी खेंकसली.

रामाला चातीची आठवण झाली.

'मला तरी नुसतंच कुठं पाठविलंय, तिनं' चात काढून रामानं त्या म्हातारीला दाखविली. ती चात दृष्टीला पडल्याबरोबर म्हातारींच हृदय भरून आलं. तिनं रामाला जवळ जवळ मिठी मारली. तिला थोडा वेळ बोलताही येईना. रामाला जवळ घेऊन ती त्याच्या पाठीवरुन हात फिरवित राहिली.

'माझी नात ! ती सुखरुप आहे ना ? किती काळजी पडली होती मला तिची. मला सोडून गेली न सांगता. कशी तरी जगते आहे जीव धरुन मी. आतां सुटले एकदाची काळजीतून. थांबा आतां मी जेवायचं करते, जेऊन मग बसू या आपणं बोलत'

खूप खूप चांगला स्वयंपाक केला होता तिनं. गेले पांच सहा दिवस रामा चालून चालून दमून गेला होता अगदी. त्याला भूकही मनापासून लागली होती. म्हातारीनं आग्रह कर करुन वाढलं त्याला.

रामानं आपलं लग्न कस झाल, पुढे राजाच विघ्न कस उत्पन्न झालं, आपण काम कशी केली, देऊळ बांधून दिलं. तलाव बांधून दिला अन् आता राजान काय सांगितल होत तेही पण रामान सांगून टाकल.

म्हातारीन शांतपणान सगळी हकीकत ऐकून घेतली.

'आतां मात्र राजान आपली शंभर वर्ष भरायची युक्ती काढली आहे. पण माणस नाहीशी करून जगांतला दुष्टपणा नाहीसा होणार नाही. त्यांना चांगलाच धडा शिकविला पाहिजे म्हणजे मग ताळ्यावर येतील ते. मी देखील खूप ऐकल होत त्या राजाबद्दल. माझ्या नातीच्या-ही वाटेला तो जाईल अशी कल्पना नव्हती माझी. पण होणाऱ्या गोष्टी चुकत नाहीत कधी. परमेश्वर झाला तरी अपराध भरण्याचीच वाट पहात असतो. मी करते यांतून तुमची सुटका अन् राजाचीही चागलीच जिरविते. आता खुशाल झोंप घ्या तुम्ही. दमून आला आहात. मग सकाळी सांगेन काय करायच ते.'

रामा अंथरुणावर पडला. त्याला लागलीच गाढ झोंप लागली.

सकाळीं तो दचकून उठला. किती वेळ त्याला झोप लागली होती कुणास ठाऊक. तो उठला त्यावेळीं चांगला दिवस वर आला होता. म्हातारीच लक्ष होतच त्याच्याकड. ती स्वयंपाक करण्यांत गुंग झाली होती.

' मुद्दामच मी उठविलं नाहीं तुम्हाला. दमून आला होता. अन् आताही आणखी चालायचं आहे तुम्हाला. हातपाय धुवा जेऊन घ्या. म्हणजे सांगते काय करायचं तें ' म्हातारीनं त्याला प्रेमानं सांगितलं.

रामानं पोटभर जेऊन घेतलं. आताही म्हातारीनं त्याला शिदोरी बांधून दिली.

' ही दोऱ्याची गुंडी घ्या .आपल्यापुढं सोडा तिला अन् ही गडगडत जिकडं जाईल तिकडं जायचं तिच्यामागून. उद्यां संध्याकाळी तुम्ही एका नदीकांठाच्या गांवात जाल. तिथं एका घराजवळ ही गुंडी थांबेल. त्या घरांत विचारा मला रात्री मुक्कामाला जागा देता का म्हणून ? ते लोक नाहीं म्हणायचे नाहींत. रात्रीं झोपा तिथ. सकाळीं त्या घरातल्या मुलांना त्यांची आई उठवू लागेल, ती उठणार नाहींत. बाप आरडाओरड करील तरीही उठणार नाहींत. पण बाहेर कशाचा तरी आवाज होईल. कुणाचीही पर्वा न करतां ती धावत धावत उघडीं बोडकी बाहेर जातील अन् तीच तुमची वस्तु. '

' कसली आहे ती ? ' रामान मध्येंच शंका विचारली.

'गोल आहे ती. दोहोकडे चामड लावलेल असत, रणढोल का काय म्हणतात त्याला. ती वस्तु मिळवा तुम्ही अन् द्या राजाला नेऊन. राजा म्हणाला कीं ही नव्हती मी आणायला सांगितली? तर मग मला तरी ही काय करायची मी फोडून टाकतो नदींत अस म्हणून त्याच्या दोहोबाजूवर बडवत बडवत राजवाड्यांतून निघा. नदीकडे जाऊन नदींत फोडून टाका. म्हणजे होईल तुमची सुटका यातून. मग राजा येईल ताळ्यावर. तो नाहीं तुम्हाल परत कधीं त्रास द्यायचा.' म्हातारीन रामाला सगळ समजाऊन सांगितल.

रामान सगळ ऐकून घेतल. म्हातारीला नमस्कार करून रामा निघाला.

* * *

समोर ती गुंडी सोडली होती. ती गडगडून जाई. रामा तिच्यामागून जाऊ लागे. लोक त्याच्याकड आश्चर्यान पहात 'कुठ निघालात पाव्हण?' म्हणुन विचारल कीं तो सांगें, 'निघालो झाल या गुंडीच्या मागे.' लोकाना ते पटाव कस? ते त्याला वेडा ठरवीत. त्याच्याकड पाहून हंसत. पण रामाच कुणाकडच लक्ष नव्हत. रानांतून नदींतून ती गुंडी सरळ जाई. रामाही पण तीमागून जाई. त्याला पाण्याचा त्रास होत नसे. जंगलाचही कांहीं वाटत नसे. अखेरीस तो एका शहरांत आला. बोळाबोळांतून ती गुंडी जाऊं लागली. ती एका घराजवळ थांबली. रामान ओळखल हेंच तें आपल घर. रामान हांक मारली. आपणाला

रात्रीपुरती जागा देता का म्हणून विचारल. त्या लोकांनीही कांहीं आढेवेढे घेतले नाहींत. रामा घरांत जाऊन राहिला.

त्या घरांत माणसही पण फार नव्हती. नवरा बायको आणि दोन मुलगे. एक होता आठ नऊ वर्षाचा अन् एक अगदीं लहान तान्हेला. रात्र झाली. रामा झोंपला नव्हताच. त्याला झोंप कुठली येणार? आजनि सांगितलेल्या गोष्टीची त्याला सारखी आठवण होत होती. त्या संधीचीच तो वाट पहात होता.

उजेडायला थोडासा वेळ होता. त्या मुलाची आई उठली 'बाबा, ऊठ ना आतां उजडायला लागलंय् बघ. लांकूडं गोळा करून आणायला पाहिजेत. त्यांच्या पोटांत दुखायला लागलंय्, त्यांना चालता देखील येत नाहीं, तूंच नको का जायला?' ती आपल्या मुलाला हालवून उठवीत होती.

'मी नाहीं जा, अजून कितीतरी रात्र आहे. इतक्या लवकर उठून काय करायचं? मी नाहीं उठत.' तो पुनः पांघरूण घेऊन निजला.

'अरे, घरांत आता चहा करायला सुद्धां जळण नाहीं. ऊठ ना.' ती पुनः आर्जवून सांगत होती. तिनं आणखी दोनतीनदां सांगितलं. पण त्या मुलावर कांहींच परिणाम झाला नाही उलट तो जास्तीच पांघरूण घेऊन घुसमटून पडला.

आपला मुलगा अजून उठला नाहीं असं पाहून थोड्या वेळानं बापही उठला. तो आपल्या मुलाकडं आला.

'बाळा, उठ ना. हा बघ दिवस उजाडला. घरांत चहा देखील करायला जळण नाहीं. ऊठ ना आतां. कशी थंडी वाजायला लागलीय चहाशिवाय कसं करायचं. जा लौकर आण थोडसं जळण गोळा करून ' पण बापाच्या सांगण्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. मुलगा परत झोंपला. आईबापाचं दोघांचंही मुलांन ऐकलं नाहीं. आईनच शेजारून जळण मागून आणलं. चहा केला.

घरांत काय काय चाललं आहे याकडे रामाचं लक्ष होतंच. तो त्यांचं बोलण कान देऊन ऐकत होता. आतां सकाळ झाली मुलगा अजूनही उठला नव्हताच. पुढं काय होतंय हें रामा डोळयांत तेल घालून पहात होता.

तुतारी वाजली. जवळच एक शिपायांचा तळ होता. त्यांची कवाईत सुरू होण्याची ती सूचना होती. थोड्या वेळांत रणढोलाचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्या ढोलाचा आवाज कानावर पडतो न पडतो तोंच त्या मुलानें आपल्या आंगावरचे पांघरूण फेंकून दिलें. उघडा बोडकाच तो धांवत निघाला. रामा पाळतीवर होताच. तोही त्या मुलाच्या मागोमाग धांवला.

म्हातारीनें सांगितलेली वस्तू तीच होती. रामाला आनंद झाला. पण ती मिळवणं काय सोपं नव्हतं. कितीतरी शिपाई होते तिथं. त्यांची कवाईत चालली होती. जो ढोल वाजविणारा होता त्याच्या आजूबाजूला तुतारी वाजविणारे होतें. रामाची एकट्याची तिथं कांहीच डाळ शिजली नसती. पण रामा निराश झाला नाहीं. त्यांची कवाईत होण्याची तो वाट पहात राहिला.

कवाईत झाली. ते सगळे शिपाई आपआपल्या कामाला लागले. पण तो ढोल त्या तुताऱ्या संभाळण्यासाठीं त्यांनीं शिपाई ठेवलेच होतें. चार पाहरेकरी नंग्या तलवारी घेऊन पहारा करीत होतें. शक्तीचा तिथं कांहींच उपयोग नव्हता. युक्तीच उपयोगी पडणार होती. रामानीं विचार केला. युक्ती काढायला आज कांहीं त्याची बायको जवळ नव्हती. म्हातारीही जवळ नव्हती. त्याला स्वतःचीच अक्कल चालविणं भाग होतं.

युक्ती सुचली. रान सगळं मोकळं होते पण गवत थोड थोडं वाढलं होतं. अगदी वाळून गेलं होतं. रामानीं तंबाखू ओढण्यासाठीं म्हणून थोडासा विस्तव मागून घेतला. शिपाई आपल्याकडे पहात नाहींत अस पाहून त्यांनीं तो खाली टाकला. विस्तवांनीं आपलं काम करण्यास सुरवात केली. वाराही सुटला होता. सगळं रान पेट घेऊं लागलं. सगळे शिपाई आग विझवूं लागले. रामाही त्यांना मदत करण्यासाठी म्हणून त्यांच्यांत शिरला. मदत करणाऱ्याला कोण नको म्हणणार.

आगीमुळं आणखीन जोराचा वारा सुटला. आगही सारखी भडकूं लागली. सगळ्या शिपायांची धांवपळ सुरूं झाली. रामा मदत करण्याचा नुसता देखावा करीत होता. त्याचे सगळं लक्ष त्या रणढोलाकडे होतें. आग आटोक्यांत येईना म्हणून पहाऱ्यावरचे शिपाईही मदतीला धांवले. रामाला काय तेच पाहिजे होतं. आपणांकडे कुणाच लक्ष नाहीं अस पाहून रामानी तो ढोल उचलला. तो पळत सुटला.

सारखा पळतच राहिला तो, आपल्या गांवांत आला. झोंपडी-कडं पाहिलं तर तिथं कोण होतं ? सगळी उघडी पडली होती. ' राजवाड्यांत गेली असली पाहिजे माझी बायको ' त्यानं आपल्या मनाशीं विचार केला. आतां आपण अगोदर तिची सुटका केली पाहिजे.

तो राजवाड्याकडे आला. त्याच्या हातातला तो रणढोल पाहून सर्व लोक हसूं लागले. एवढं करून ढोलच का आणला यानं ? आतां काय राजा याची गय करतो फुकटं मरणार बिचारा. प्रत्येकाला त्याची कींव येत होती. पण रामाला कांहींच वाटलं नाहीं त्याचं.

तो सरळ राजवाडयांत जाऊं लागला. देवडीवरील पहारे-कऱ्यानं त्याला अडविलं, ' कुठं निघालास तूं ?' ' कां ! राजानंच मला वस्तु आणायला पाठविलं होतं. त्याची ती नेऊन द्यायला निघालोय, सोडा मला आंत. '

पहारेकरी सोडीनात, रामा आंत जाण्यासाठीं धडपड करूं लागला. मोठमोठयानं ओरडून सांगत होते पहारेकरी पण रामा त्यांचं ऐकायला तयार कुठं होता ? राजाच्या कानावर ती दंगल गेली. रामा आला आहे हें कळल्यावर त्याची घाबरगुंडी उडाली पुनः हा इथं आला म्हणून तो अगदी गर्भगळित होऊन गेला. रामाला त्याला भेटायचं नव्हतं; पण रामा थोडाच दाद देणार. सगळ्यांना बाजूला सारून तो राजापुढं आला.

राजाला त्याची भीति वाटली होती पण त्याच्या हातांत रण-ढोलच आहे हें पाहून त्याला किती तरी समाधान वाटलं. तो हसूं लागला.

' कायरे कुठं गेला होतास तूं ! ' राजानं दरडावून विचारलं. ' खूप खूप लांब गेलो होतो. तिथं आंबराई होती. शिपाई होते. ' इत्यादि इत्यादि त्यानं सगळं सांगितलं.

' छट् गाढवा, मी तिकडं कुठं जायला सांगितलं होतं तुला ! अन् आणलंस तरी काय ! '

' ही पहा वस्तू आणलीय ' रामान तो ढोल राजापुढं ठेवला. ' मूर्खा, तुला ढोल आणायला सांगायला आम्ही ढोल कधी पाहिले नाहींत होय ! अन् तुला मी कांहीं तिकडं जायला सांगितलं नव्हतं अन् ढोल आणायला तर मुळींच सांगितलं नव्हतं. पकडा रे याला.' त्यांनी जवळच्या शिपायाला हुकूम केला.

' थांबा ! आतां तुम्ही मला पकडणार हे ठरलंच. पण माझी एक विनंति आहे. आपण म्हणतां ती ही वस्तू नव्हे तर मला तरी जवळ ठेऊन कशाला घ्यायची ? ही फोडून मला नदींत टाकून द्या. म्हणजे मी येईन परत काय घाल ती शिक्षा भोगायला. '

असल्या साध्या गोष्टीला राजाने आढेवेढे घेतले नाहींत. ' बर तर जा पण ताबडतोब परत ये. ' राजानं त्याला बजावलं.

रामा परतला. राजा आपली वस्तू नव्हे असं म्हणतो आहे नव्हे. राजवाड्याचा उंबरठा ओलांडल्याबरोबरच त्यानं त्या ढोलावर दोन्ही हातांनीं बडवायला सुरवात केली.

त्याचं ढोल बडवण जोरात सुरू झाल्यावर राजाच्या शिपायांना वाटलं आपणाला लढाईवर निघण्यासाठीं ढोल वाजतो आहे.

ते भराभर आपआपल्या जागेवरून उठले. रामाच्या पाठोपाठ जाऊं लागले. दोन चार मिनिटातच राजाचं सगळं सैन्य रामाच्या मागें जाऊ लागले.

आतां मात्र राजाची छाती दडपून गेली. त्यानं आपल्या शिपायांना हाक मारली. पण ते कुठले ऐकायला ? ते आपले सरळ रामामागं जाऊं लागलें.

आतां रामाचीच हुकमत होती त्यांच्यावर. आपणावर हे उलटून पडायला कमी करणार नाहींत. आपल्या राजेपणाचीच काय पण आपल्या जीवाचीही राजाला शाश्वती वाटेनाशी झाली. रामाला शरण जाण्याशिवाय आतां मार्ग राहिला नव्हता. आपलं राजेपण, आपला अपमान, सगळं तो विसरून गेला. त्याला आपला जीव बचावून घ्यायचा होता.

धांवत धांवत तो रामापुढे आला.

'रामा, रामा थांबव त्या शिपायांना. तूं काय मागशील तें देतो मी. त्यांना परत जाऊ दे आपल्या जागेवर'

'छट् मी कुठ बोलावलं होत त्यांना. ते आपण होऊनच माझ्या मागे लागले आहेत. जा घेऊन त्यांना तुला ते पाहिजे असतील तर. मला नको अडवूस मध्ये हा ढोल फोडून टाकू दे !'

राजान आपल्या सैन्याला परत यायला सांगितलं. पण ऐकायला कोण तयार होत ? ते रामाच्याच मागे लागले होते. आतां मात्र कांहीच उपाय चालेना.

'रामा, रामा, माझं अर्धं राज्य घे, पण या शिपायांना परत माझ्याकडे दे.'

'मी कांहीं नाही सांगणार त्यांना' रामा पुढें चालू लागला. आतां मात्र राजान आपला सगळा राजेपणा सोडला. तो त्याच्या पायांवर पडला.

'रामा, माझं सगळं राज्य घे. तुझी बायको तुला परत ने. पण मला अभयदान दे.'

रामाला त्याची कींव आली.

'मला रे काय करायच तुझं राज्य ? मला माझी बायको देशील ? पुनः नाही तिच्या वाटेला जाणार ?'

'नाही.'

'पुनः नाहीं लोकांना छळणार ?'

'नाहीं.'

'पुनः नाही राजा म्हणून फुकटचा मोठेपणा मिळविणार ?'

'नाहीं.'

'साध्या माणसाप्रमाण वागशील ?'

'वागेन.'

'माणसाप्रमाण रावशील ?'

'रावेन'

'सगळ राज्य, सगळी संपत्ती लोकाना देशील ?'

वा. क्र. ८०२५ (१२)
दि. ८६-५१
देईल

रामान सगळ्या गोष्टी कबूल करून घेतल्या.

'जा आता परत मी कांहीं करणार नाहीं तुला.'

रामान त्याला अभय दिलं. राजा परत गेला. रामान नदी-वर जाऊन तो ढोल फोडून नदींत टाकला.

रामाची बायको शरण यायची ती राहिलीच पण राजाच शरण आला. रामान त्याला भिकारी बनविलं. माणूस बनविलं.

पण हें कसं झालं?

राजाला वाटेल तसं वागायला कां होत हें ठाऊक आहे? त्याच्या हातांत सत्ता असते. सत्ता कशामुळं येतें? शिपायामुळं. शिपाईच नाहीत तर सत्ता गाजविणार कशी तो! अन् राजाचे शिपाई तर रामाच्या ढोलामागं होते. रामान कांहीं म्हटलं असत तर त्यांनीं नाकारलं नसत. म्हणूनच रामाला राजा शरण गेला.

रामाला त्याची बायको परत मिळाली. लोकांना आता आपणावर जुलूम करायला राजा नाहीं म्हणून समाधान वाटलें. तें सुखान राहू लागले. सगळे रामाला देवाप्रमाणं मानू लागले.

आहे की नाहीं ढोलाची अन् रामाची करामत!

IRBK-0108026
अनुक्रमांक २८६०७
भाग अ.भा.
क्रमांक ५८४४
नों. दि. ३-८-६१